# दि कमर्शिअल को-ऑप. बँक लिमिटेड, कोल्हापूर

## जबाबदारीपुर्वक कर्ज देण्याच्या पद्धती (Responsible Lending Conduct )

रिझर्व बँक ऑफ इंडियाने बँकांच्या मध्ये कर्जदारांना कर्ज मंजुर / अदा करतेवेळी कर्जदारांशी वाजवी उचीत व्यवहार करणे संबधी सन २००३ पासुनच सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार वेळोवेळी रिझर्व बँक सर्व बँकांच्यावर लक्ष ठेवीत असते. रिझर्व बँकेस असे आढळून आले आहे की बँका अशा जंगम / तरल मालमत्तेचे दस्तऐवज कर्जदाराना वेळेत परत करीत नाहीत. तसेच ताराणावरील कर्जाचा बोजाही वेळेत कमी केला जात नाही. त्यामुळे कर्जदाराना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. रिझर्व्ह बँकेने कर्जदारांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि बँकाकरिता दि. सप्टेंबर १३, २०२३ चे परिपत्रक RBI/2023-24/60 DOR.MCS.REC.38/ 01.01.001/2023-24 Responsible Lending Conduct Release of Movable Immovable Property Documents on Repayment/ Settlement of Personal Loans नुसार संपूर्ण परतफेड मिळाल्यावर आणि कर्ज खाते बंद केल्यावर सर्व जंगम/अचल मालमत्तेची कागदपत्रे जारी करणे आवश्यक केले आहे.

त्यामधील मार्गदर्शक तत्वांच्या बाबत बँकेने पुढीलप्रमाणे निकष जारी केलेले आहेत -

### अ.) कर्जदार अथवा सहकर्जदार यांचे अकस्मातिक निधनानंतर जंगम व तरल मालमत्ता मुळ कागदपत्रे परत देण्याबाबतचे बँकेचे धोरण –

खालील मुद्यांच्या आधारे बॅंक मुळ कागदपत्रे परत देण्याबाबतीत दक्षता घेईल.

१. बँक शाखाधिकारी कर्जदार यांचा मृत्यु दाखला झेरॉक्स प्रत बँक दप्तरी घेऊन त्याची मुळ मृत्यु दाखल्यासोबत त्याची पडताळणी करून घेतील.

२. वारसांच्याकडून कर्जासंबधी मुळ कागदपत्रे परत मागण्याबाबतचा अर्ज कर्जाबाबतच्या सविस्तर माहितीसह घेतला जाईल.

३. वरील नमुद अर्जासोबत मुळ कागदपत्रे परत मागणाऱ्या व्यक्तीची सर्व के.वाय.सी. कागदपत्रे मुळ कागदपत्रासोबत पडताळणी करून बँक दप्तरी घेतला जाईल.

४. मयत कर्जदार हा स्व:त कर्जदार वा इतर कोणास जामिनदार आहे का ? , त्यांनी इतर कर्जास आपली मालमत्ता तारण अथवा जोड तारण स्वरुपात तारण म्हणून दिली आहे किंवा नाही याबाबत बँक खात्री करेल. जर अशी बाब आढळून आल्यास त्यासंबधी मुळ कागदपत्रे परत मागणाऱ्या व्यक्तीस कर्जाचे दायित्व कमी करणेबाबत कर्ज भरणे बाबत लेखी सुचीत केले जाईल.

५. मयत कर्जदारांची सर्व कर्ज रक्कम अदा केली गेली असल्याची खात्री शाखाधिकारी करेल.

६. मुळ कागदपत्रे परत मागणाऱ्या व्यक्ती / वारसाकडून "इंडेमनिटी बॉन्ड " घेतला जाईल.

७. तदनंतर मुळ कागदपत्रे परत मागणाऱ्या व्यक्ती / वारसाना कर्ज खात्याचे उतारे, कर्ज खाते बंद झालेचा दाखला व इतर मुळ कागदपत्रे परत दिले जातील.त्यासंबधी कागदपत्रे मिळालेबाबत पोच घेतली जाईल.

८. कर्जाबाबतची कागदपत्रे मुळ शाखा व्यतिरिक्त इतर सोयीच्या शाखेतून हवी असल्याची मागणी केल्यास त्याबाबत मुळ कागदपत्रे परत मागणाऱ्या व्यक्ती / वारसाना मुळ कागदपत्रे परत देण्याचा दिनांक कळवला जाईल जेणेकरून त्यांची गैरसोय होणार नाही.

९. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे इतर सोयीच्या शाखामधून मुळ कागदपत्रे देण्याची मागणी आल्यास कागदपत्रांची विहित दिनांकावर कागदपत्रे देऊन त्याची पोच दप्तरी ठेवली जाईल.

१०. नवीन मंजुर केल्या जाणाऱ्या कर्ज प्रकरणामध्ये कर्ज करारपत्रामध्ये अथवा तारण दस्तामध्ये मुळ कागदपत्रे कोणास परत द्यावी याबाबतचा उल्लेख केला जाईल. त्याप्रमाणे मुळ कागदपत्रे परत दिली जातील.

११. कर्जदार यांची मिळकतीमध्ये सह मालकी असेल तर सह मिळकतधारक व मयत कर्जदार यांचे वारस हे मुळ कागदपत्र स्विकारतील.

१२. मयत कर्जदार यांचे वारसदार अथवा मुळ कागदपत्रे परत मागणऱ्या व्यक्ती यांच्यामध्ये दुरावा वा कलह असल्यास व त्यासंबधी बँकेस नोटिस मिळालेस बँक मा. न्यायालयाच्या पुढील आदेशाशिवाय मुळ कागदपत्रे परत देणार नाही.

**ब.) कर्जदार अथवा सहकर्जदार यांचे अकस्मातिक निधनानंतर जंगम व तरल मालमत्ता त्रयस्थ व्यक्तीस ( थर्ड पार्टी ) तारण दिली असल्यास त्यावेळी मुळ कागदपत्रे परत देताना कायदेशीर सल्ला घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल.**

## खालील पध्दतीने बोजा कमी केला जाईल –

अ . मॉर्गेजने तारण घेतलेल्या मिळकतीबाबत –

Registrar of Assurance कडील बॅंक बोजा कमी करणेबाबत इंटीमिनेशन देऊन, सोसायटीस बोजा कमी करणे याबाबत पत्राने कळवून व रिकंव्हेअन्स डीड करून तारणाचा बोजा कमी केला जाईल.

ब. तारण मिळकतीचा सरसाई पोर्टल वर नोंद केलेला बोजा कमी केला जाईल.

क. वाहन तारण कर्जाच्या बाबत प्राधिकृत परिवहन विभाग (RTO ) यांचेकडील हायपोथिकेशन बोजा कमी करणेसाठी संबंधीताकडे तशा आशयाचे पत्र सोपवले जाईल.

ड. विसमा पॉलीसी व पोस्ट खाते बचत रक्कमेवर दिलेल्या कर्जाबाबत सबंधीत विमा कंपनी व पोस्ट खाते याचेशी पत्र व्यवहार करून त्या तारणावरील “ असाइनमेंट चार्ज “ कमी केला जाईल.

ड. कर्जदाराने कर्जाची परतफेड केल्यानंतर कर्जदारास कागदपत्रे परत घेऊनसाठी व बॅंकचा तारणावरील बोजा कमी करण्याबाबत लेखी कळविले जाईल. त्याबाबत लेखी पोच कर्जदारांच्याकडून घेतले जाईल.

## मूळ जंगम/जंगम मालमत्तेची कागदपत्रे परत करण्यास विलंब झालेस त्याबाबतीत नुकसान भरपाई -

मूळ जंगम/जंगम मालमत्तेची कागदपत्रे हरवल्यास/नुकसान झाल्यास, अंशतः किंवा पूर्णपणे, बँकेला कर्जदाराला जंगम/अचल मालमत्तेच्या कागदपत्रांच्या डुप्लिकेट/प्रमाणित प्रती मिळविण्यासाठी मदत करावी लागेल आणि त्यासाठी येणारा संबंधित खर्च देखील बँकेकडून केला जाईल. तथापि, अशा प्रकरणांमध्ये, प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी बँके ला ३० दिवसांचा अतिरिक्त वेळ उपलब्ध असेल आणि त्यानंतर विलंब कालावधी नंतर म्हणजेच, एकूण ६० दिवसांच्या कालावधीनंतर रिझर्व बँकेने दिलेल्या निर्देशानुसार दंडासाठी गणना केली जाईल.